# Co-operative Audit: Ratio Analysis and CAMELS Rating

## Performance, Compliance & Risk Monitoring


**CA Parikshit K Bhadade**

B com ( Gold Medal ) ,M com , DISA ,

DIRM (All India 1st Rank ), FAFD ,


Mob No : 91055 69555 . 9890029333

**Web : www.caparikshitbhadade.in**

**Disclaimer:**

The views and opinions expressed in this presentation are my personal views and do not reflect the official policy or position of the Institute of Chartered Accountants of India (ICAI), the Reserve Bank of India (RBI), the Western India Regional Council (WIRC), or any of their respective branches.

- This presentation is intended for informational purposes only and should not be construed as professional advice. The presenter does not assume any responsibility for the accuracy, completeness, or relevance of the information presented. Please consult a qualified professional for specific advice tailored to your individual circumstances.


Audit Information (Pre Preparations) & Documents
Audit Observations & Explanations
Discussion Of Draft Report with management
Finalization of Audit Memo & Rating to Society
Rectification Report
( O Format )
Audit Cycle

# Due Dates for Co-operative Societies Audit-

| Particulars | Due Dates |
|---|---|
| Finalizing Accounts by Society | May 15th |
| Handing Over for Audit | June 1st |
| Audit Completion | July 31st |
| Uploading Audit Report | August 31st |
| Annual General Meeting | September 30th |
| Annual Return Due | September 30th |
| Audit Rectification Report by Society | within 3 months from the date of submission of report by the Auditor |

# लेखापरीक्षण अहवाल मॅट्रिक्स (Audit

| अनु.क्र. | अहवालाचा भाग / दस्तऐवजाचे नाव | संदर्भ कायदा / नियम / प्राधिकृत सूत्र | विशेष टिप्पणी / माहिती | नमुना / परिशिष्ट क्र. |
|---|---|---|---|---|
| 1 | **लेखापरीक्षण प्रमाणपत्र** (Audit Memorandum ) | नियम 69(3) | सहकारी बँकांसाठी **नमुना N-1** व इतर संस्थांसाठी **नमुना N-2** मध्ये द्यावयाचे आहे. संपूर्ण माहिती व तरतुदी यामध्ये नमूद करणे आवश्यक आहे. नफा/तोट्याची स्थिती स्पष्ट करणे गरजेचे आहे. | नमुना N-1 / N-2 |
| 2 | **मुख्य लेखापरीक्षण अहवाल** (Main Audit Report) | कलम 81(5)(ब) व नियम 69(3) | लेखापरीक्षण अहवाल **भाग A, B, C** मध्ये विभागलेला असतो.<br>**भाग A** - गंभीर अनियमितता (उदा. फसवणूक, निधींचा गैरवापर इत्यादी)<br>**भाग B** - आर्थिक स्थितीचे विश्लेषण, कार्यपद्धतीतील त्रुटी, व्यवस्थापन संबंधी निरीक्षणे<br>**भाग C** - वाउचर तपासणीतील त्रुटी, अनधिकृत खर्च, कर्ज दस्तऐवजांमधील त्रुटी<br>**नफा/तोट्यावर तरतुदींचा परिणाम स्पष्ट करणे आवश्यक आहे.** | सहायक निबंधकांचे परिपत्रक (ADT/H-1/A.M., दिनांक 10.12.1986) |
| 3 | **लेखापरीक्षण नमुने** (Audit | निबंधक | सर्व संस्थांसाठी **नमुना क्रमांक** 1 अनिवार्य आहे. संस्थेच्या प्रकारानुसार इतर नमुने | नमुना क्र. 1 (सर्वांकरिता) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 4 | **विशिष्ट अहवाल (Specific Report)** | **कलम 81(5)(ब)** | **लेखापरीक्षणात फसवणूक आढळल्यास, लेखापरीक्षण अहवाल सादर केल्यानंतर 15 दिवसांत निबंधकांकडे विशिष्ट अहवाल देणे बंधनकारक आहे. तसेच FIR नोंदविणे आवश्यक आहे.** | **15 दिवसांत सादर करणे** |
| 5 | **विशेष अहवाल (Special Report)** | कलम 81(5)(ब) | जर अनियमिततेमुळे संस्थेला **आर्थिक तोटा** झाला असेल, तर लेखापरीक्षण अहवालासोबतच विशेष अहवाल सादर करावा लागतो. | लेखापरीक्षण अहवालासोबत |
| 6 | **आर्थिक विवरणपत्रांची प्रमाणित प्रत** | नियम 69(3) | खालील विवरणपत्रांची लेखापरीक्षकाने **प्रमाणित प्रत सादर करणे आवश्यक**:<br>- ताळेबंद<br>- नफा-तोटा पत्रक / उत्पन्न व खर्च पत्रक<br>- लेखाकीय धोरणे व टीप<br>- रोक प्रवाह पत्रक / पावत्या व देयकांचे विवरण<br>- जोड पत्रके | संस्थेने मान्य केलेले विवरणपत्र |
| | **लाँग फॉर्म** | रिझर्व बँक / | **शहरी सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती बँका, राज्य सहकारी** | RBI / NABARD द्वारा |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 8 | सामान्य टिप्पण्या (General Remarks) | निबंधक / RBI | लेखापरीक्षण दरम्यान वारंवार होणाऱ्या चुका, अपुरे दस्तऐवजीकरण, अधिकाऱ्यांचे दोष, आंतरिक नियंत्रणातील त्रुटी याबाबत टिप्पणी. LFAR किंवा लेखापरीक्षण मेमोमध्येही समाविष्ट असते. | लेखापरीक्षकाच्या टिपणीनुसार |
| 9 | **गुणवर्गीकरण व गुणपत्रक (Audit Classification & Mark Sheet)** | निबंधक / RBI / नाबार्ड | संस्थेचे आर्थिक व प्रशासकीय कामकाज लक्षात घेऊन **A, B, C किंवा D वर्ग** देणे आवश्यक. **गुणवर्गीकरण पत्रक** अहवालात समाविष्ट असावे. | ठराविक गुणवर्गीकरण पत्रक |
| 10 | **अनिवार्य 6 परिशिष्टे (Schedules)** | कलम 81, नियम 69(6) | खालील 6 **परिशिष्टे** अनिवार्य आहेत:<br>1. कायद्याच्या विरोधातील व्यवहार<br>2. लेखाशुद्धीतून वगळलेले घटक<br>3. खर्च/उत्पन्नामध्ये महत्त्वाच्या त्रुटी<br>4. शंकास्पद वसुली<br>5. सरकारी अनुदानाचा गैरवापर<br>6. व्यक्तीगत खर्च संस्था खर्चात टाकलेले | परिशिष्टे 1 ते 6 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 11 | कार्यकारी सारांश (Executive Summary) | नियम 69(7) | वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी (AGM) थोडक्यात निष्कर्ष मांडणे आवश्यक. गंभीर त्रुटींसाठी संक्षिप्त संदर्भ क्रमांकाने नोंद करावी. व्यवस्थापनाचे स्पष्टीकरण यामध्ये देता येईल. | AGM सादरीकरणासाठी |

🔎 **विशेष सूचना:**

- **भाग A** मध्ये नमूद केलेल्या त्रुटींवर **विशेष किंवा विशिष्ट अहवाल** तयार करणे बंधनकारक आहे.
- लेखापरीक्षकांनी केवळ अंकगणितीय तपासणी न करता संस्थेच्या **संपूर्ण कारभाराची गुणवत्ता, कायदेशीरता, नैतिकता, व आर्थिक स्थिती** यांचे सखोल परीक्षण करणे अपेक्षित आहे.
- जर **विशिष्ट / विशेष अहवाल वेळेत सादर केला नाही**, तर लेखापरीक्षकावर **शिस्तभंगाची कारवाई** होऊ शकते.

# लेखापरीक्षकांनी ठेवावयाची वर्किंग पेपर्स - स्वरूप व महत्त्व

लेखापरीक्षणाच्या वेळी संस्थेने लेखापरीक्षकास दिलेली माहिती, निरीक्षणे व आवश्यक कागदपत्रे यांचा समावेश लेखापरीक्षकाच्या **वर्किंग पेपर्स**मध्ये केला जातो. हे वर्किंग पेपर्स केवळ लेखापरीक्षणाच्या दृष्टीनेच नव्हे, तर भविष्यात **गुन्हेगारी किंवा प्रशासकीय कारवाईसाठी** देखील महत्त्वाचे ठरतात. म्हणून लेखापरीक्षकाने हे सर्व पेपर्स काळजीपूर्वक **सुरक्षितपणे जतन करणे** आवश्यक आहे.

**वर्किंग पेपर्समध्ये समाविष्ट असलेले कागदपत्रे व माहिती:**

१) संस्थेची **नोंदणीकृत नियमावली** व त्यामधील वेळोवेळी करण्यात आलेले **सुधारणांचे नोंदवही**.

२) **महत्त्वाचे कायदेशीर दस्तऐवज, करारनामे व सभेच्या कार्यवृत्तांचे उतारे** - जे लेखापरीक्षणाशी संबंधित आहेत.

३) संस्थेच्या **अंतर्गत नियंत्रण प्रणालीचे अभ्यासाचे निरीक्षण नोंदवही** (Internal Control Study Record).

४) मागील वर्षाचे **लेखी वाचलेले लेखापरीक्षण अहवाल** (Audited Financial

८) मागील वर्षीच्या **लेखापरीक्षण अहवालातील महत्त्वाच्या बाबींची नोंद**.

९) संस्थेला दिलेले **लेखापरीक्षणाचे पूर्वसूचना पत्र** तसेच चालू वर्षाच्या पत्रव्यवहाराशी संबंधित पत्रे.

१०) **संचालक मंडळ व उपसमित्यांच्या बैठकीचे कार्यवृत्तांचे उतारे**, जे चालू लेखापरीक्षण वर्षाशी संबंधित आहेत.

११) लेखापरीक्षक व त्याच्या टीमने तयार केलेला **लेखापरीक्षण कार्यक्रम व कार्यपत्रक**.

१२) **चालू वर्षाचे लेखापरीक्षणाचे वर्किंग पेपर्स**.

१३) खात्रीपत्रे व खात्रीसाठी संस्थेकडे मागवलेली पत्रे.


१४) संस्थेकडून मिळालेली उत्तरे - मागवलेल्या माहिती व स्पष्टीकरणांबाबत.

१५) **ड्राफ्ट लेखापरीक्षण अहवाल व मसुदा आर्थिक विवरणपत्रे**.

१६) चालू लेखापरीक्षणाशी संबंधित **आर्थिक माहितीची निव्वळ स्वरूपातील पत्रके**.

**निष्कर्ष:**

लेखापरीक्षणाच्या गुणवत्ता नियंत्रणासाठी तसेच भविष्यातील स्पष्टीकरणासाठी लेखापरीक्षकाने वरील सर्व वर्किंग पेपर्स व्यवस्थित, तारखेसह, सुस्थितीत व सुरक्षित ठिकाणी **किमान ८ वर्षे** ठेऊन द्यावीत. ही कार्यपद्धती **विवेकशील**


Components of CAMELS Rating
C
A
M
E
L
S
Capital Adequacy
Asset Quality
Management
Earnings
Liquidity
Sensitivity

## महाराष्ट्र शासन

### सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग


सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे


डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग, नवीन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, पुणे - ४११००१

दूरध्वनी क्र. ०२० [illegible] मेल :- [illegible]mm..aud[illegible] @ [illegible]ail.com


जा.क्र.सआ.-२० /लेप.-६/नापत व सेवक पतसंस्था/ले.प.वर्गवारी निकष/ ६०७ /२०२४ दि.२५/०३/२०२४

राज्यातील नागरी / ग्रामिण बिगर शेती
सहकारी पतसंस्था व सेवक सहकारी पत
संस्थांच्या वैधानिक लेखापरीक्षण वर्गवारीचे
सुधारित निकष लागू करणेबाबत...

# CAMELS (BANK AND SOCIETY )



# 1. भांडवल पर्याप्तता (Capital Adequacy) :- १०० गुण

| Particulars | Ratios | Marks |
|---|---|---|
| **भाडंवल निधीची (स्वनिधी) ज़ोखमभारती जिंदगीशी प्रमाण** | > 9% | 50 Marks |
| **भाडंवल निधीची (स्वनिधी) वाढवणाची क्षमता :-** | 1. कर्ज रकमेतून उपविधीनुसार कर्जाचे प्रमाणात भाग रकम कपात करीत असल्यास | 02 Marks |
| | 2. नफ्यातून सहकार कायघातली तरतुदी प्रमाण राखावी निधीची उभारणे केली असल्यास | 06 Marks |
| | 3. नफ्यातून सहकार कायदा नियम व संस्था उपविधीतील तरतुदींनुसार इतर निधींची उभारणी | 02 Marks |
| **वसूल भाग भांडवलात झालेली वाढ** | > 10% | 15 Marks |
| **स्वनिधीतील वाढ:-** | >=7.5% | 25 Marks |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | भांडवल निधीचे (स्वनिधी) जोखीमभारीत जिंदगीशी प्रमाण (CRAR- Capital to Risk Weighted Assets Ratio):- | | ५० | |
| | अ) ९% पेक्षा अधिक | ५० | | |
| | ब) ७% पेक्षा अधिक ते ९% पर्यंत | ३६ ते ४५ | | |
| | क) ५% पेक्षा अधिक ते ७% पर्यंत | २६ ते ३५ | | |
| | ड) ३% पेक्षा अधिक ते ५% पर्यंत | १६ ते २५ | | |
| | इ) ३% व त्यापेक्षा कमी | ० ते १५ | | |

## 11. भांडवल पर्याप्तता प्रमाण तथा भाडवल निधीचे (स्वनिधीचे) जोखीम भारीत मालमत्ता / जिंदगीशी प्रमाण: CRAR (Capital to Risk Weighted Assets Ratio) / CAPITAL ADEQUACY RATIO(CAR):

भारतीय रिझर्व्ह बँकेने माहे एप्रिल १९९२ मध्ये बेसल कमीटीच्या निर्णयानुसार भारतातील बँकांना (विदेशी बँकासहीत) भांडवल पर्याप्तता प्रमाणे संकल्पना राबविण्यास सुरुवात झाली.

सदरची संकल्पना लागू करण्याचा मुख्य हेतू मार्केटमधील बदलामुळे उदा.क्रेडीट रिस्क व मार्केट रिस्क, व्याज दर, विदेशी चलन विनिमय दर किंवा करंसी एक्सचेंज रेट, कम्मोडीटी रेटइ.मुळेबँकेस काही लॉस निर्माण झाले तर सदरचे लॉस सस्टेन करण्यासाठी भांडवलाची किमान पर्याप्तता आहे किंवा कसे? त्यामुळे नियमीत दैनंदिन व्यवहारावर त्याचा परिणाम न होता सदरचे लॉस बँक सहन करु शकेल इतपत किमाल भांडवल पर्याप्तता असणे आवश्यक आहे.

नियामक मंडळाने त्याचेकडील परिपत्रक जा.क्र.पतसंस्था/सआ-५/ नि.मं./सन.२०२२/२४११ दि.२३.०८.२०२२ नुसार राज्यातील पतसंस्थांना भांडवल निधीचे (स्वनिधीचे)जोखीम भारीत मालमत्ता /जिंदगीशी असलेले प्रमाणे आर्थिक वर्ष सन.२०२२-२३ पासूल लागू केले आहे. त्यानुसार पतसंस्थांना स्वनिधीचे प्रमाण ९% असणे आवश्यक आहे.

* संस्थेकडे जोखीम भारीत मालमत्तेच्या प्रमाणात किमान पर्याप्तता आहे काय हे निश्चित करण्यासाठी CRAR ची परिगणना केली जाते.

* पर्याप्त स्वनिधी असणे ही बाब संस्थेच्या आर्थिक अडचणीच्या वेळी किंवा आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाली तर त्यावेळी सदरचा निधी शॉक अॅबसॉर्बर (shock absorber) म्हणून काम करतो व त्यामुळे स्वनिधी अधिक असणे ही बाब संस्थेच्या दृष्टीने महत्वाची आहे.

* CRAR काढण्याचे सुत्र:

$$\text{CRAR} = \frac{\text{स्वनिधी}}{\text{जोखीम भारीत मालमत्ता / जिंदगीचे मुल्य}} \times १००$$

• स्वनिधीची परिगणना करतांना पुढील नमुद प्रमाणे प्रमाणित करण्यात आलेल्या ताळेबंदात ३१ मार्च अखेर दर्शविण्यात आलेल्या खात्यांवरील रकमांचा अंतर्भाव करावा.

1.वसूल भाग भांडवल
2.राखीव निधी
३.इमारत निधी
४.लाभांश समकरण निधी

५. गुंतवुणक चढउतार निधी
६. उत्तम जिंदगीवरील /उत्पादक कर्जावरील तरतुद
७. संचीत नफा
८. एन.पी.ए. तरतुद जादा केली असल्यास जादाची रक्कम (वजा) ब:
यामध्ये खालील पुढील बाबींचा अंतर्भाव करावा.
९. संचीत तोटा
१०. कमी केलेली एन.पी.ए तरतुद
११. कमी केलेली थकव्याज तरतुद
१२. कराव्या लागणाऱ्या परंतु न केलेल्या खर्चाच्या तरतुदी.

**स्वनिधी = अ ची एकुण बेरीत वजा ब ची एकुण बेरीज(अ-ब)**

## जोखीम भारीत मालमत्तेचे / जिंदगीचे मुल्य परिगणना (Risk weighted asset value):

३१ मार्च. अखेरच्या प्रमाणित ताळेबंदात दर्शविण्यात आलेल्या मालमत्ता व येणे बाजुस दर्शविण्यात आलेल्या मालमत्तांचे विविध खात्यावरील रकमा व त्या खात्यावरील मालमत्तेच्या जोखीमीचे प्रमाण निश्चित करुन दिलेले आहे. त्याप्रमाणे परिगणना करुन त्या जिंदगीची जोखीम किती आहे. त्या सर्वाची बेरीज करुन आलेल्या एकुण भारीत मुल्याशी स्वनिधीचे प्रमाण किती आहे हे पुढील तक्त्यात नमुद केले आहे.

## अ:-जोखीम मालमत्तेचे मुल्य परिगणना:

| अ.क्र. | मालमत्ता | येणे बाकी | जोखीम भार (%) | जोखीमयुक्त मालमत्ता ५=(३x४/१००) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | रोख शिल्लक | | | |
| २ | जिल्हा बँकेतील व इतर बँकातील (कलम ७० प्रमाणे) शिल्लक रक्कमा | | | |
| | अ) चालु ठेव खाते | | २० | |
| | ब) बचत ठेव खाते | | २० | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | इतर अन्य (कलम ७० व्यतिरीक्त ) संस्थेतील शिल्लक | | | |
| | अ) चालु ठेव खाते | | १०० | |
| | ब) बचत ठेव खाते | | १०० | |
| | क) अन्य पतसंस्था / मल्टीस्टेट संस्थातील शिल्लक | | १०० | |
| ४ | गुंतवणुक: | | | |
| | अ) जिमस बँक भागातील गुंतवणुक | | २० | |
| | ब (इतर सहकारी संस्थांच भागातील गुंतवणुक | | १०० | |
| | क) जिमस बँक व इतर बँकातील (कलम ७०) | | २० | |
| | ड) सरकारी रोखे | | २.५ | |
| | इ) अन्य रोखे / बाँडस / लिक्वीड फंड गुंतवणुक | | १०२.५ | |
| | ई) पोस्टल एनएससी / केव्हीपी / मधील गुंतवणुक | | २.५ | |
| | उ) कर्मचारी भविष्य निर्वाह निधीची बँकेच्या ठेवीमधे / भविष्य निर्वाहनिधी ट्रस्टमधे केलेली गुंतवणुक | | २० | |
| | ऊ) इतर अन्य सर्व (मल्टीस्टेट व राज्य नोंदणीकृत) पतसंस्था मधील ठेवी | | १०० | |
| | ए) सह. साखर कारखाने, सुतगिरण्या, प्रक्रिया संस्था, सर्वप्रकारच्या (सहकारी संस्था / शैक्षणिक / धर्मदाय संस्था इ.संस्थामधील गुंतवुणक) | | १२५ | |
| | ऐ) बंद पडलेल्या सहकारी बँका / पतसंस्थातील गुंतवणुक पुर्ण तरतुद व्याजासह केली नसल्यास | | १२५ | |
| | ओ) बंद पडलेल्या सह बँका / पतसंस्थामधील गुंतवणुक संपुर्ण तरतुद व्याजासह केली असल्यास | | ० | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | इतर अन्य (कलम ७० व्यतिरीक्त ) संस्थेतील शिल्लक | | | |
| | अ) चालु ठेव खाते | | १०० | |
| | ब) बचत ठेव खाते | | १०० | |
| | क) अन्य पतसंस्था / मल्टीस्टेट संस्थातील शिल्लक | | १०० | |
| ४ | गुंतवणुक: | | | |
| | अ) जिमस बँक भागातील गुंतवणुक | | २० | |
| | ब (इतर सहकारी संस्थांच भागातील गुंतवणुक | | १०० | |
| | क) जिमस बँक व इतर बँकातील (कलम ७०) | | २० | |
| | ड) सरकारी रोखे | | २.५ | |
| | इ) अन्य रोखे / बाँडस / लिक्वीड फंड गुंतवणुक | | १०२.५ | |
| | ई) पोस्टल एनएससी / केव्हीपी / मधील गुंतवणुक | | २.५ | |
| | उ) कर्मचारी भविष्य निर्वाह निधीची बँकेच्या ठेवीमधे / भविष्य निर्वाहनिधी ट्रस्टमधे केलेली गुंतवणुक | | २० | |
| | ऊ) इतर अन्य सर्व (मल्टीस्टेट व राज्य नोंदणीकृत) पतसंस्था मधील ठेवी | | १०० | |
| | ए) सह. साखर कारखाने, सुतगिरण्या, प्रक्रिया संस्था, सर्वप्रकारच्या (सहकारी संस्था / शैक्षणिक / धर्मदाय संस्था इ.संस्थामधील गुंतवुणक) | | १२५ | |
| | ऐ) बंद पडलेल्या सहकारी बँका / पतसंस्थातील गुंतवणुक पुर्ण तरतुद व्याजासह केली नसल्यास | | १२५ | |
| | ओ) बंद पडलेल्या सह बँका / पतसंस्थामधील गुंतवणुक संपुर्ण तरतुद व्याजासह केली असल्यास | | ० | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | कर्जे व अग्रीम | | | |
| | अ) ठेवतारण / एलआयसी तारण / एनएससी तारण इत्यादी | | ० | |
| | ब (वैयक्तीक जामिनकी / विनातारणी कर्जे | | १२५ | |
| | क) कर्मचारी कर्जे | | २० | |
| | ड) रु.२.०० लाखापर्यंतची सोनेतारण कर्जे | | ५० | |
| | इ) रु.२.०० लाखापर्यंतची गृहतारण हौसिंग कर्जे | | ५० | |
| | ई) इतर सर्व प्रकारची अल्प, मध्यम, दिर्घ मुदत तारणी कर्जे | | १०० | |
| ६ | स्थावर मालमत्ता | | | |
| | अ) जमीन, इमारत | | १०० | |
| | ब (डेडस्टॉक / फर्निचर , बँक काऊंटर, संगणक, संगणक प्रणाली व ईलेक्ट्रीकल साहीत्य इत्यादी | | १०० | |
| | क) वाहने | | १०० | |
| ७ | इतर मालमत्ता | | | |
| | अ) गुंतवणुकीवरील येणे व्याज | | २० | |
| | आ) कर्जावरील येणे व्याज | | १०० | |
| | इ) भांडवली खर्च (जागा / इमारत / खरेदी / बांधकाम (अॅडव्हान्स | | १२५ | |
| | ई) तसलमात /अॅडव्हान्स येणे रक्कमा | | १२५ | |
| | उ) शिल्लक स्टेशनरी | | १०० | |
| | उ) इतर येणे रकमा | | १०० | |
| | ई) डिपॉजीट, जीएसटी, आयकर,येणे रकमा | | १०० | |
| ८ | दुबेरजी रकमा | | ० | |
| ९ | एकुण जोखीमयुक्त मालमत्ता | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | स्वनिधीतील वाढ :- | | २५ |
| | अ) स्वनिधीमध्ये गत वर्षाशी तुलना करता ७.५% व त्यापेक्षा जास्त वाढ असल्यास | २५ | |
| | ब) स्वनिधीमध्ये गत वर्षाशी तुलना करता ५% व त्यापेक्षा जास्त ते ७.५% पेक्षा कमी वाढ असल्यास | २० | |
| | क) स्वनिधीमध्ये गत वर्षाशी तुलना करता २.५% व त्यापेक्षा जास्त ते ५% पेक्षा कमी वाढ असल्यास | १० | |
| | ड) स्वनिधीमध्ये २.५% पेक्षा कमी वाढ असल्यास | ५ | |
| | इ) स्वनिधीमध्ये गत वर्षीच्या तुलनेत घट / ऱ्हास असल्यास | ० | |

१. स्वनिधी :-

स्वनिधीची परिगणना खालीलप्रमाणे करण्यात यावी.

**स्वनिधी** = वसुल भागभांडवल + राखीव निधी + इमारत निधी + लाभांश समानीकरण निधी + निव्वळ नफ्यातून उभारलेला गुंतवणूक चढउतार निधी + नफा विभागणीतून निर्माण केलेले व कोणतीही बाह्यदेयता नसलेले निधी + उत्पादक व अनुत्पादक जिंदगीची जादा केलेली तरतूद + शिल्लक नफा (मागील शिल्लक नफा + चालू वर्षातील नफ्यातून अंदाजित लाभांश रक्कम वजा जाता शिल्लक नफा)

वजा (-) संचित तोटा (-) कमी केलेली उत्पादक व अनुत्पादक जिंदगीची तरतूद (-) कमी केलेली थकव्याज तरतूद (-) कराव्या लागणा-या मात्र न केलेल्या खर्चाची तरतूद

(स्वनिधीमध्ये सभासद कल्याण निधी, सेवक कल्याण निधी, धर्मादाय निधी, झीज निधी, संशयित व बुडीत कर्ज निधी या निधींचा समावेश करू नये.)

## 2. जिंदगी की गुणवत्ता (Assets Quality):- १०० गुण

| Particulars | Ratios | Marks |
|---|---|---|
| निवड अनुत्पादक जिंदगी (Net NPA ) प्रमाण:- | 0% | 30 Marks |
| ढोबळ अनुत्पादक जिंदगी (Gross NPA) प्रमाण:- | <= 5 % | 15 Marks |
| गतवर्ष अखेर असणाऱ्या अनुत्पादक (NPA) कर्जापैकी चालू आर्थिक वर्षात झालेल्या वसुलीचे प्रमाण:- | >=30% | 15 Marks |

## २. जिंदगीची गुणवत्ता (Assets Quality) :- १०० गुण

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | निव्वळ अनुत्पादक जिंदगी (Net N.P.A.) प्रमाण :- | | ३० | |
| | अ) ०% ते ५% पर्यंत असल्यास | ३० ते २० | | |
| | ब) ५% पेक्षा अधिक ते १०% पर्यंत असल्यास | १९ ते १० | | |
| | क) १०% पेक्षा अधिक ते १५% पर्यंत असल्यास | ९ ते ० | | |
| २ | ढोबळ अनुत्पादक जिंदगी (Gross N.P.A.) प्रमाण :- | | १५ | |
| | अ) ५% व त्यापेक्षा कमी असल्यास | १५ | | |
| | ब) ५% पेक्षा अधिक ते १०% पर्यंत असल्यास | १४ ते १० | | |
| | क) १०% पेक्षा अधिक ते १५% पर्यंत असल्यास | ९ ते ५ | | |
| | ड) १५% पेक्षा अधिक ते २०% पर्यंत असल्यास | ४ ते ० | | |
| ३ | गत वर्षअखेर असणाऱ्या अनुत्पादक (N.P.A.) कर्जापैकी चालू आर्थिक वर्षात झालेल्या वसुलीचे प्रमाण :- | | १५ | |
| | अ) २०% पेक्षा अधिक ते ३०% व त्यापेक्षा अधिक असल्यास | ११ ते १५ | | |
| | ब) १०% पेक्षा अधिक ते २०% पर्यंत असल्यास | ६ ते १० | | |
| | क) १०% पर्यंत असल्यास | ० ते ५ | | |

# - जिंदगी की गुणवत्ता (Assets Quality):- १०० गुण

| Particulars | Ratios | Marks |
|---|---|---|
| **कर्ज व्यवहार:-** | 1. कर्ज प्रकरणी आवश्यक ते दस्तऐवज व कागदपत्रे घेऊन कर्ज अर्ज परिपूर्ण भरलेला असल्यास | 4 Marks |
| | 2. कर्ज दाराचे संपत्ती स्थिती आर्थिक पद धारण मालमत्ता परतफेडीची क्षमता इत्यादी बाबत टिप्पणी सादर करून व उपविद्येतील तरतुदीनुसार कर्ज मंजूर व वितरित केली असल्यास | 4 Marks |
| | 3. उपविधी मधील तरतुदी मन्या मग मंडळी निर्णयाप्रमाणे वैयक्तिक व समूह महत्त्व कर्ज मर्यादेचे (individual and group explore limit) पालन केले असल्यास | 4 Marks |
| | 4. ज्या कर्जास तारण घेणे आवश्यक आहे अशा कर्जाच्या बाबतीत पुरेसे व विक्रो योग्य धारण धारण मालमत्तेचा शोध अहवाल घेऊन मूल्यांकन करून कर्ज वितरित केली जात असल्यास | 4 Marks |
| | 5. त्यावर तारण मालमत्तेचे नोंदणीकृत गहाणखत करून कर्जबोजा नोंद केली जात असल्यास | 4 Marks |

## - जिंदगी की गुणवत्ता (Assets Quality):- १०० गुण

| Particulars | Ratios | Marks |
|---|---|---|
| **कर्ज व्यवहार:-** | 6. उपविधीतील तरतुदीप्रमाणे एकूण कर्जामध्ये कर्ज प्रकरणानुसार कलाम कर्ज मर्यादेचे पालन केले असल्यास | 4 Marks |
| | 7. कर्ज मंजूर उद्देशाप्रमाणे कर्ज रक्कमेच्या विनियोगाची तपासणी केली असल्यास | 4 Marks |
| | 8. कर्जास तारण मालाची/ मालमत्तेची नियमित तपासणी होत असल्यास | 3 Marks |
| | 9. वितरित केलेल्या कर्जातून भाग रक्कम व्यक्तिरिक्त अन्य कपातील केल्या नसल्यास | 3 Marks |
| | 10. नियामक मंडळ निर्णयाप्रमाणे कर्जावरील कलाम व्याजदर मर्यादेचे पालन केले असल्यास | 3 Marks |
| | 11. उपविधी मधील कर्ज विषयक नियमास अनुसरून संचालक व त्यांचे नातेवाईक यांची कर्ज व्यवहार निष्कर्ष बाबत देणे कर्ज मर्यादेचे उल्लंघन झाले नसल्यास | 3 Marks |

# 3. व्यवस्थापन ( Management) :- १०० गुण

| Particulars | Ratios | Marks |
|---|---|---|
| **सभा कामकाज:-** | 1. सभांची सूचना (आधी मंडळ बैठक व्यवस्थापन समिती) विहित व्यवस्थित पाठविली असल्यास | 1 Marks |
| | 2. वार्षिक सर्वसाधारण सभा सहकार कायदा कलम ७५(२) मधील तरतुदीनुसार विहित मुदतीत घेतली असल्यास | 1 Marks |
| | 3. संचालक मंडळाचे उपविधीतील तरतुदी प्रमाणे दरमहा किमान एक सभा घेऊन सभा कामकाज होत असल्यास | 2 Marks |
| | 4. संचालक मंडळ सभेमध्ये आयत्या वेळेच्या विषयात धोरणात्मक बाबींवर निर्णय घेतले नसल्यास | 2 Marks |
| | 5. उपविधीतील तरतुदीनुसार उप समित्यांची स्थापना करून कामकाज होत असल्यास | 2 Marks |
| | 6. उपविधीनुसार व्यवस्थापन समितीने तिची कर्तव्य व जबाबदाऱ्यांचे पालन करून कामकाज केले असल्यास | 2 Marks |
| | 7. संचालक मंडळ सभेचे इतर प्रत्येक संचालकांना वेळीच पाठविले जात असल्यास | 2 Marks |

## - व्यवस्थापन ( Management) :- १०० गुण

| Particulars | Ratios | Marks |
|---|---|---|
| **सहकार तज्ञ संचालक:-** | 1. उपविधीनुसार बँकिंग/ कायदा/ लेखांकन/ संधी लेखापाल/ सहकार क्षेत्रातील व्यवस्थापकीय पातळीवरील किंवा संचालक मंडळ सदस्य म्हणून किमान ५ वर्षाचा अनुभव असेल यापैकी कमाल दोन तज्ञ संचालक विकृत केले असल्यास | 2 Marks |
| | 2. वरील मधील नमूद पात्रतेप्रमाणे एक तज्ञ संचालक, संचालक मंडळावर स्वीकृत केला असल्यास | 1 Marks |
| | 3. वरील मधील नमूद पात्रतेप्रमाणे एक तज्ञ संचालक, संचालक मंडळावर स्वीकृत केला नसल्यास किंवा दोन पेक्षा जास्त तज्ञ संचालक स्वीकृत केला असल्यास | 0 Marks |
| | 4. तज्ञ संचालक किमान ५०% संचालक मंडळ साभांना उपस्थित असल्यास | 2 Marks |
| | 5. तज्ञ संचालक ५०% पेक्षा कमी संचालक मंडळ सरांना उपस्थित असल्यास | 0 Marks |

## - व्यवस्थापन ( Management) :- १०० गुण

| Particulars | Ratios | Marks |
|---|---|---|
| **सहकारी शिक्षण व प्रशिक्षण:-** | 1. एका आर्थिक वर्षात एकूण सभासदांपैकी किमान १/५ सभासदांना शासनाने अधिसूचित केलेल्या प्रशिक्षण संस्थेत १ते ३ दिवसाचे प्रशिक्षण दिले असल्यास<br>2. संचालकांना शासनाने अधिसूचित केलेल्या प्रशिक्षण संस्थेत किमान १ ते ३ दिवसाचे प्रशिक्षण दिले असल्यास<br>3. अधिकारी/ कर्मचाऱ्यांना (वसुली अधिकारी धरून) शासनाने अधिसूचित केलेल्या प्रशिक्षण संस्थेत वर्षात किमान २ ते ७ दिवसांचे प्रशिक्षण दिले असल्यास<br>4. व्यवस्थापक / सर व्यवस्थापक/ महाव्यवस्थापक/ कार्यकारघ संचालक/ मुख्य कार्यकारी अधिकारी वरिष्ठ अधिकारी नेमणुका:- | 10 Marks<br>10 Marks<br>10 Marks<br>6 Marks |
| **अनुत्पादक जिंदगी ( NPA) मधील संशयित वर्गवारीतील( Doubtful Category )कर्जदारांवर कायदेशीर कारवाई:-** | 100% | 20 Marks |

## - व्यवस्थापन ( Management) :- १०० गुण

| Particulars | Ratios | Marks |
|---|---|---|
| कलम १०१ खालील वसुली दाखले/ कलम ९१ खालील निवाडे अंमलबजावणी | >=75% | 10 Marks |
| सभासत्व:- | 1. गत सालच्या तुलनेत सभासद संख्येत झालेली वाढ<br>2. सभासद प्रवेश<br>3. वारस नेमणूक ( Nomination)<br>4. भाग प्रमाणपत्र /भाग दाखला | 10 Marks<br>2 Marks<br>2 Marks<br>2 Marks |
| संचालक मंडळ निवडणूक- संचालक मंडळाच्या निवडणुकी संदर्भात कायदा व नियमातील तरतुदीप्रमाणे आवश्यक ती पूर्तता वेळेवर केली असल्यास | | 2 Marks |

## 4 . उत्पन्न (Earnings) :- १००-

| Particulars | Ideal Ratios | Marks |
|---|---|---|
| निव्वळ नफ्याचे सरासरी खेळत्या भांडवलाशी प्रमाण | > 1% | 10 Marks |
| निव्वळ नफ्याचे सरासरी कर्ज अधिक गुंतवणूकोसी प्रमाण:- | > 1.25% | 10 Marks |
| निव्वळ नफ्याचे स्वनिधीशी प्रमाण:- | > 10 % | 30 Marks |
| व्याजातील सरासरी दुरावा (Margin):- | > 3 % | 10 Marks |
| शिल्लक नफा व सर्व निधीस वर्ग केलेल्या नफ्याचे निव्वळ नफ्याशी प्रमाण | > 75 % | 10 Marks |
| व्यवसायातील नफ्याचे (operating profit) सरासरी खेळत्या भांडवलाशी प्रमाण :- | > 2 % | 10 Marks |
| व्यवस्थापन खर्चाचे सरासरी खेडत्या भांडवलाशी प्रमाण | < =2% | 15 Marks |
| तरतूदी | | 5 Marks |

## ५. A.L.R., (Average Lending Rate), ( कर्जाचा सरासरी व्याज दर ), (Average Borrowing Rate) (ठेवींचा सरासरी व्याज दर):

मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य यांचेकडील परिपत्रक जा.क्र.ना.बँका/ डी-४ / पतसंस्था /कर्ज-ठेवी /व्याजदर /२०१८/०८ दि.१२ नोव्हेंबर २००८ मध्ये ALR (Average Lending Rate ), ABR(Average Borrowing Rate), Spread (दुरावा), नफा आणि अनुषंगीक बाबींची निश्चितीची पध्दत नमुद केली आहे.
संस्थेने त्याचा ALR व ABR विचारात घेवून संस्थेचे ठेवी व कर्जावरील व्याजदर निश्चित करण्यात यावे.

**ABR व ALR ठरविण्याची पध्दती खालीलप्रमाणे:**

**१. ABR ठेवींचा सरासरी व्याज दर** = $\dfrac{\text{वर्षभरात ठेवींवर दिलेले व्याज (Interest paid during the year)}}{\text{वर्षभरात ठेविंची सरासरी (Average deposit during the year )}} \times १००$

**सरासरी ठेवी =** माहे एप्रिल ते मार्च या कालावधीतील जनरल लेजरप्रमाणे प्रत्येक महिन्याच्या अखेरीस दर महिना अखेरीस प्रत्येक ठेवखात्यांवरील दर्शविलेल्या ठेवींच्या रकमांची एकुण बेरीज करुन येणारी रक्कम म्हणजे एकुण ठेवी व सा १२ महिन्याच्या एकुण ठेवींच्या रकमेस १२ ने भागल्यास सरासरी ठेवींची रक्कम निश्चित करता येते.

**सरासरी ठेव** = $\dfrac{\text{१२ महिन्याच्या एकुण ठेवींची रक्कम}}{\text{१२}}$

**२. ALR कर्जाचा सरासरी व्याज दर** = $\dfrac{\text{वर्षभरात कर्जावर मिळालेल व्याज (Interest received during the year)}}{\text{(वर्षभरात कर्जाची सरासरी (Average Loan during the year )}} \times १००$

सरासरी कर्जे : माहे एप्रिल ते मार्च या कालावधीतील प्रत्येक महिन्याच्या अखेरीस जनरल लेजरप्रमाणे दर महिना अखेरीस सर्व कर्जखात्यावर दर्शविलेल्या कर्जाच्या रकमांची एकुण बेरीज करुन येणारी रक्कम म्हणजे एकुण कर्जे व सा १२ महिन्याच्या एकुण कर्जाच्या रकमेस १२ ने भागल्यास सरासरी कर्जाची रक्कम निश्चित करता येते.

**सरासरी कर्जे** = $\dfrac{\text{१२ महिन्याच्या एकुण कर्जाची रक्कम}}{\text{१२}}$

- ABR व ALR यामधील दुरावा हा किमान ३ % असावा.
- ठेवीवरील व्याजदर ठरवितांना Asset liability Management प्रमाणे नेमका Missmatch कोणत्या बकेटमध्ये आहे या बाबीचाही विचार करण्यात यावा .
- दुरावा वजा प्रशासकीय खर्च= नफा

# नफा-तोटा पत्रकाशी संबंधीत गुणोत्तरे

| अ. क्र. | तपशिल | गणना सुत्र | आदर्श प्रमाण % |
|---|---|---|---|
| 1 | एकूण ऊत्पन्नाचे खेळते भांडवलाशी | एकूण ऊत्पन्न ÷ खेळते भांडवल ×100 | 11 % |
| 2 | व्यवस्थापन खर्चाचे खेळते भांडवलाशी | व्यवस्थापन खर्च ÷ खेळते भांडवल ×100 | 2 % |
| 3 | निव्वळ नफयाचे खेळते भांडवलाशी | निव्वळ नफ़ा ÷ खेळते भांडवल ×100 | 1-2% |
| 4 | निव्वळ नफयाचे एकूण उत्पन्नाशी | निव्वळ नफ़ा ÷ एकूण उत्पन्न ×100 | 10 % |
| 5 | व्यवस्थापन खर्चाचे एकूण उत्पन्नाशी | व्यवस्थापन खर्च ÷ एकूण उत्पन्न ×100 | 30 ते 35 % |
| 6 | आस्थापना खर्च एकूण उत्पन्नाशी | आस्थापना खर्च ÷ एकूण उत्पन्न ×100 | 20 ते 25 % |
| 7 | दिलेले व्याज एकूण उत्पन्नाशी | दिलेले व्याज÷ एकूण उत्पन्न ×100 | 50 ते 55 % |

# 5 ) तरलता (Liquidity ) :- १०० गुण

| Particulars | Ratios | Marks |
|---|---|---|
| **सरासरी कर्ज व ठेवी प्रमाण (CD Ratio -Credit to Deposite Ratio ):-** | 65% - 70 % | 40 Marks |
| **वैधानिक तरलता निधी प्रमाण (S.L.R- Statutory Liquidity Ratio):-** | 1. नियामक मंडळांनी निर्धारित केल्यानुसार संस्थेने दैनंदिन पद्धतीने वैधानिक तरलता निधी प्रमाण राखून तरल ते पोटी कलम ७० व १४४- १०अ प्रमाणे गुंतवणूक केली असल्यास<br>2. संस्थेने वैज्ञानिक तरलता निधीबाबत दैनंदिन पद्धती ने नोंदणी ठेवून मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अशा नोंदी प्रमाणित करून संचालक मंडळ सभेत दरमहा नोंद घेतली असल्यास<br>3. नियामक मंडळाने निर्धारित केल्यानुसार संस्थेने वैज्ञानिक तरलता निधीचे विहित नमुन्यातील तिमाही विवरण पत्र लिहीत मुदतीत निबंधक कार्यालयास सादर केले असल्यास | 15 Marks<br>3 Marks<br>2 Marks |
| **रोख राखीव निधी प्रमाण ( Cash Reserve Ratio ):-** | 1. नियामक मंडळाने निर्धारित केल्यानुसार संस्थेने दैनंदिन पद्धतीने रोख राखीव निधी प्रमाण राखून कलम ७० व १४४ - ९ अ घे पालन केले असल्यास<br>2. संस्थेने रोख राखीव निधीबाबत दैनंदिन पद्धतीने नोंदी ठेवून मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अशा नोंदी प्रमाणित करून संचालक मंडळ सभेत दर महा नोंदणी घेतली असल्यास<br>3. निया मग मंडळांनी निर्धारित केल्यानुसार संस्थेने रोख राखीव निधीचे विहित नमुन्यातील तिमाही विवरणपत्र विहित मुदतीत निबंध कार्यवालयास सादर केले असल्यास | 5 Marks<br>3 Marks<br>2 Marks |

## - तरलता (Liquidity ) :- १०० गुण

| Particulars | Ratios | Marks |
|---|---|---|
| मुदत ठेवींचे एकूण ठेवींशी सरासरी प्रमाण (Ratio of Term Deposits to Total Deposits):- | < 70% | 10 Marks |
| एकूण गुंतवणुकीत अनुत्पादक गुंतवणुकीचे प्रमाण :- | < 5% | 10 Marks |
| गतसालच्या तुलनेत ठेवीमधील सरासरी वाढ:- | > 15% | 10 Marks |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | सरासरी कर्जे व ठेवी प्रमाण (CD Ratio - Credit to Deposit Ratio) :- | | ४० | |
| | अ) ६५% ते ७०% पर्यंत असल्यास | ४० | | |
| | ब) ७१% ते ७५% पर्यंत असल्यास | २५ | | |
| | क) ७६% ते ८०% पर्यंत असल्यास | १० | | |
| | ड) ६०% ते ६४% पर्यंत असल्यास | ३० | | |
| | इ) ५५% ते ५९% पर्यंत असल्यास | २५ | | |
| | ई) ५०% ते ५४% पर्यंत असल्यास | १५ | | |
| | उ) ४५% ते ४९% पर्यंत असल्यास | १० | | |
| | ऊ) ४५% पेक्षा कमी व ८०% पेक्षा जास्त असल्यास | ० | | |

## सी.डी. रेशो- (Credit-Deposit Ratio )

- संस्थेने उभारलेल्या ठेवींच्या किती प्रमाणात, संस्थेने कर्ज वाटप केलेले आहे याचे प्रमाण काढण्यासाठी सीडी रेशोचा वापर केला जातो.
- मा. सहकार आयुक्त कार्यालयाच्या **दि.28/03/2003** च्या पत्रानुसार सी.डी. रेशो कसा काढावा याबाबत मार्गदर्शक सुचना दिलेल्या आहेत.
- सीडी रेशो काढण्याचे सुत्र

**एकूण कर्जे - कर्ज वाटपास उपलब्ध असलेले स्वनिधी - बाहेरुन उभारलेले कर्ज**

- सीडी रेशो = ------------------------------------------------------------------X100

एकूण ठेवी

# कर्ज वाटपास उपलब्ध स्वनिधी

- यामध्ये कर्ज वाटपास उपलब्ध स्वनिधी खालिलप्रमाणे काढावयाचा आहे.

---

- **कर्ज वाटपास उपलब्ध स्वनिधी = (अ)- (ब)**

  अ मध्ये खालील बाबींचा समावेश करण्यात यावा.

  1. **स्वनिधी**

  - **वजा -**

    ब मध्ये खालील बाबींचा समावेश करण्यात यावा.

    1. राखीव निधी
    2. स्थावर व जंगम मालमत्तेतील गुंतवणूक
    3. सहकारी संस्थाच्या भागातील गुंतवणूक

# रोख राखीव निधी प्रमाण :- ( CRR )

- नियामक मंडळाने **दि.10/05/2019** रोजीच्या पत्रानुसार कलम 144-9अ व 144-10अ मधील तरतुदीनुसार पतसंस्थानी ठेवावयाचे रोख राखीव निधी व तरलता निधीचे प्रमाण निश्चित करुन दिलेले आहे.
- नियामक मंडळाने सदरचा निर्णय **दि.01 जुलै 2019** पासुन पतसंस्थाना लागू केलेला आहे.

**अ रोख राखीव निधी प्रमाण - (CRR-Cash Reserve Ratio)**

- नियामक मंडळाने दि. 10/05/2019 रोजीच्या पत्रानुसार, संस्थेकडे असलेल्या मागील तिमाही अखेरच्या एकूण ठेवीच्या **2% पेक्षा** कमी नसेल इतकी रक्कम लगतचे चालू तिमाहीसाठी दैनंदिन पध्दतीने रोख राखीव निधी म्हणून ठेवावी लागेल असे निश्चित केलेले होते.
- नियामक मंडळाने त्यांचे दि.30.11.2019 च्या पत्रान्वये, रोख तरलता निधीचे प्रमाण **2% वरुन 1%** केलेले आहे.

  उदा. दि.30/06/2022 रोजी **क्ष** संस्थेच्या एकुण ठेवी रु.200 कोटी असल्यास त्याच्या **1 टक्के** प्रमाणे रु.2.00 कोटीपेक्षा कमी नाही इतकी रक्कम दि. 01/07/2022 ते दि.30/09/2022 या कालावधीत रोख राखिव निधी म्हणून ठेवणे बंधनकारक आहे. (म्हणजेच सदर तिमाहित प्रत्येक दिवशी किमान रु.2.00 कोटीची रक्कम रोख राखीव निधी म्हणून ठेवणे आवश्यक आहे.)

# रोख राखीव निधीमध्ये खालिल रक्कमांचा समावेश होतो. (मुख्यालय व शाखांची एकत्रित रक्कम )

1 संस्थेकडे असलेली रोख रक्कम (नियम १०७ मध्ये नमूद मर्यादेचे अधीन राहून)

2 ~~संस्थेची अन्य बँकेच्या बचत खात्यात असलेली एकूण रक्कम~~

3 संस्थेची अन्य बँकेच्या चालू खात्यात असलेली एकूण रक्कम

4 पंधरा दिवसांपेक्षा जास्त नाही एवढ्या मुदतीच्या अल्पमुदत ठेवींची रक्कम

5 धारण केलेल्या निर्धारित तरलता निधीतून कलम 144-10 अ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेपेक्षा अधिक प्रमाणात केलेल्या गुंतवणूकीवर काढलेले अधिकर्ष (म्हणजेच संस्थेने **25% पेक्षा** जास्त तरलता ठेवलेली असल्यास जादा असलेल्या तरलतेच्या गुंतवणुकीवर घेतलेले तारण कर्ज )

# तरलता निधी प्रमाण (SLR- Statutory Liquidity Ratio)

- संस्थेकडे असलेल्या मागील तिमाही अखेरच्या एकूण ठेवींच्या **25% पेक्षा** कमी नसेल इतकी रक्कम लगतच्या चालू तिमाहिसाठी मुदत ठेवींमध्ये दैनंदिन पध्दतीवर ठेवावयाची आहे.
- उदा. दि.30/06/2022 रोजी **क्ष** संस्थेच्या एकुण ठेवी 200 कोटी असल्यास, त्याच्या **25%** प्रमाणे 50.00 कोटीपेक्षा कमी नाही इतकी रक्कम दि. 01/07/2022 ते दि.30/09/2022 या कालावधीत तरलता निधी म्हणून मुदत ठेव खाती गुंणतवणूक करणे बंधनकारक आहे. (म्हणजेच सदर तिमाहित प्रत्येक दिवशी किमान रु.50.00 कोटीची रक्कम तरलता निधी म्हणून मुदत ठेव खाती गुंणतवणूक करणे आवश्यक आहे.)
- **तरलता निधीसाठी खालीलप्रमाणे मुदत ठेवीमध्ये गुंतवणूक करता येईल**

1 राज्य सहकारी बँक,

2 जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक,

3 मागील सलग तीन वर्षे लेखापरीक्षण **वर्ग अ** असणाऱ्या, तसेच रिझर्व बँकेच्या अद्यावत तपासणीनुसार ए ग्रेड असणाऱ्या **नागरी सहकारी बँका**.,

4 रिझर्व बँकेच्या अद्यावत तपासणीनुसार ए ग्रेड असणाऱ्या, संस्थेच्या मुख्यालयाच्या ठिकाणी असलेल्या **राष्ट्रीयकृत तथा प्रादेशिक बँका**,

5 शासनाने सर्वसाधारण अथवा विशेष आदेशाव्दारे परवानगी दिलेल्या कोणत्याही प्रकारातील गूंतवणूक.

# रोख राखीव निधी व तरलता निधीबाबत इतर महत्वाचे मुद्दे

- वरिलप्रमाणे रोख राखीव निधी व तरलता निधीबाबत दैनंदिन पध्दतीनुसार नोंदी ठेवावयाच्या आहेत.
- सदरच्या नोंदी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दररोज प्रमाणित करणे आवश्यक आहे.
- एकूण ठेवीच्या **25% प्रमाणे** केलेल्या गुंतवणुकी व्यतिरिक्त, अतिरिक्त गुंतवणूकीवर संस्थेस कर्ज काढण्यास मुभा आहे.
- **25%** तरलता निधीच्या गुंतवणूकीवर संस्थेस कर्ज काढता येणार नाही. निर्धारित तरलतेच्या गुंतवणूकीवर कर्ज काढल्यास तरलता राखली नसल्याचे समजण्यात येईल.
- नियामक मंडळाने केलेल्या विहीत नमुन्यातील विवरण पत्रात रोख राखीव निधी व तरलता निधीबाबतची माहिती प्रत्येक तिमाहीच्या 15 व्या दिवशी किंवा तत्पूर्वी नियामक मंडळास सादर करणे बंधनकारक आहे.
- संस्थेने रोख राखीव निधी व तरलता निधीचे विहीत केलेले प्रमाण न राखल्यास **कलम 144-31अ अन्वये शास्तीची** तरतुद आहे. हि बाब विचारात घेणे आवश्यक आहे.

# ताळेबंदाशी संबंधीत गुणोत्तरे

| ताळेबंदानुसार येणा-या खेळत्या भांडवल रक्कमेशी प्रमाण | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | तपशिल | गणना सुत्र | आदर्श प्रमाण % |
| अ | भाग भांडवल व देय बाजू | | |
| 1 | वसुल भाग भांडवल | वसुल भाग भांडवल÷ खेळते भांडवल x 100 | 2 ते 4 % |
| 2 | निधी | एकुण निधी ÷ खेळते भांडवल x 100 | 4 ते 6 % |
| 3 | ठेवी | एकुण ठेवी ÷ खेळते भांडवल x100 | 80 ते 85% |
| 4 | इतर देणी | इतर देणी÷ खेळते भांडवल ×100 | 2 ते 3 % |
| 5 | निव्वळ नफ़ा | निव्वळ नफ़ा ÷ खेळते भांडवल ×100 | 1 ते 2 % |
| ब | मालमता व येणे बाजू | | |
| 1 | रोख व बँकेतील शिल्लक | रोख व बँकेतील शिल्लक ÷ खेळते भांडवल ×100 | 4 ते 6 % |
| 2 | गुंतवणुक | गुंतवणुक ÷ खेळते भांडवल ×100 | 25 % |
| 3 | कर्जे | एकूण कर्जे÷ खेळते भांडवल ×100 | 60 ते 65 % |
| 4 | इतर येणी | इतर येणी ÷ खेळते भांडवल ×100 | 6 % |

# 6 . कार्यपद्धती व नियंत्रण ( System and Control) :- १०० गुण

| Particulars | Marks |
|---|---|
| निया मग मंडळाकडील निर्णयाप्रमाणे ठेवीवरील द्यावयाच्या कमाल व्याजदर मर्यादेचे पालन केले असल्यास | 4 Marks |
| नियामक मंडळाच्या निर्णयानुसार स्थिरीकरण व तरलता सहाय्य निधीस अंशदान मुदतीत भरण केले असल्यास | 4 Marks |
| कलम ७९(१अ) व (१ब) मधील तरच दुधीप्रमाणे अनिवार्य विवरण पत्रे एम. आय. एस., इतर माहिती निर्धारित मुदतीत संबंधित निबंधकाकडे सादर केलेली असल्यास | 4 Marks |
| कलम ७५ (२अ) मधील तरतुदी प्रमाणे वैधानिक लेखापरीक्षकांची नियुक्ती केली असल्यास | 2 Marks |
| आयकर, व्यवसाय कर व इतर कायद्यानुसार लागू असणारी विवरण पत्रे विहित मुदतीत संबंधित विभागाकडे दाखल केली असल्यास | 4 Marks |
| संस्था उपविधी मध्ये नमूद उद्देशाप्रमाणे कामकाज करीत असल्यास | 4 Marks |

# - कार्यपद्धती व नियंत्रण ( System and Control) :- १०० गुण

| Particulars | Ratios | Marks |
|---|---|---|
| **दोष दुरुस्ती अहवाल:-** | 1. वैज्ञानिक लेखापरीक्षण अहवालाचा दोष दुरुस्ती अहवाल विहित मुदतीत सादर केला असल्यास<br>2. वैज्ञानिक लेखापरीक्षण अहवालात नमूद दोषांची पूर्तता केली असल्यास<br>3. अंतर्गत लेखापरीक्षण अहवालात नमूद दोषांची पूर्तता केली असल्यास<br>4. खात्याच्या तपासणी अहवालात नमूद दोषांची पूर्तता केली असल्यास | 2 Marks<br>4 Marks<br>2 Marks<br>2 Marks |
| **अंतर्गत नियंत्रण, शाखा नियंत्रण, तपासणी व्यवस्था कार्यक्षम, प्रभावी व परिणामकारक असल्यास** | | 2 Marks |
| **संस्थेने हिशोबी पुस्तके सहकार कायदा, नियम व उपविधीनुसार ठेवली असल्यास** | | 4 Marks |
| **संगणकीकरण:-** | 1. संस्थेच्या मुख्यालयासह सर्व शाखांची कामकाज संगणकीकृत असल्यास<br>2. ई डीपी व सिस्टम ऑडिट होऊन त्यातील उणिवांची पूर्तता केली असल्यास<br>3. संस्थेच्या संगणकीय डाटा सुरक्षित जतन करण्यासाठी आवश्यक उपाययोजना केली असल्यास<br>4. संस्थेचे सेवक संगणक प्रशिक्षीक असल्यास | 2 Marks<br>2 Marks<br>2 Marks<br>2 Marks |

## - कार्यपद्धती व नियंत्रण ( System and Control) :- १०० गुण

| Particulars | Marks |
|---|---|
| सभासद "आय" नमुना नोंदवही व सभासद "जे" नमुना यादी अद्ययावत असल्यास | 3 Marks |
| भाग भांडवल, सर्व प्रकारचे कर्ज, ठेवी, व्याज येणे-देणे इतर येणे-देणे थक व्याज तरतूद इ. याद्या ताळेबंदाची जुळत असल्यास | 5 Marks |
| शाखा व मुख्यालय खाते जोडतात अथवा जोडत नसल्यास याबाबत तयार केलेल्या वेळ पत्रकानुसार व्याख्या झोपतात व त्यामध्ये तीन महिन्यापेक्षा जास्त काळाच्या नोंदणी प्रलंबित नसल्यास | 5 Marks |
| बँक खात्यातील भाग्या पासबुक/ दाखल यांचेशी जुळत असल्यास अथवा जुळत नसल्यास याबाबत तयार केलेल्या वेळपत्रकानुसार बाकी जुळतात व त्यामध्ये तीन महिन्यापेक्षा जास्त काळाच्या नोंदी प्रलंबित नसल्यास | 5 Marks |
| रोख रक्कम हाताळणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून नियमानुसार योग्य ते सुरक्षा तारण व हमीपत्र (Fidelity Guarantee) घेतले असल्यास | 4 Marks |
| रोख शिल्लक, कॅश इन ट ट्रान्झिट, सोने, इ. मालमत्त्यांच्या सर्व समावेश विमा घेतला असल्यास | 4 Marks |
| कर्मचारी सेवा नियम व भविष्य निर्वाह निधी नियम तयार करून त्याचे पालन होत असल्यास | 4 Marks |
| ठराविक कालावधीने कर्मचारी वर्गाच्या  बदल्या होतात/ त्यांचे कामात बदल केला जात असल्यास | 4 Marks |

## - कार्यपद्धती व नियंत्रण ( System and Control) :- १०० गुण

| Particulars | Ratios | Marks |
|---|---|---|
| संस्थेचे सर्व ठेवीदार सभासद असल्यास | | 5 Marks |
| उपविधीतील तरतुदी प्रमाणे संचालकांच्या ठेवी घेतल्या असल्यास | | 5 Marks |
| हातावरील रोग शिल्लक सतत उपविधीनुसार मर्यादेत ठेवली असल्यास | | 5 Marks |
| सभासदांची आपल्या ग्राहक जाणा ( KYC- Know YourCustomer) निष्कर्षाची पूर्तता | 100% | 5 Marks |

# सरासरी भारांगण ( Weighted Average)

अ) भांडवल पर्याप्तता, जिंदगीची गुंतवता, व्यवस्थापन, उत्पन्न, तरतला व कार्यपद्धती व नियंत्रण या ६ घटकांना मिळालेल्या गुणांचे सरासरी बारांकन

| अ. क्रं | तपशिल | एकूण गुण | लेखापरीक्षकाने दिलेले गुण | सरासरी भरांकण | सरासरी भरांकनानुसार दिलेले गुण |
|---|---|---|---|---|---|
| १ | भांडवल पर्याप्तता (Capital Adequency) | १०० | | १५% | |
| २ | जिंदगीची गुणवत्ता (Assets Quality) | १०० | | २५% | |
| ३ | व्यवस्थापन (Management) | १०० | | १५% | |
| ४ | उत्पन्न ( Earnings) | १०० | | २०% | |
| ५ | तलरता ( Liquidity) | १०० | | १५% | |
| ६ | कार्यपद्धती व नियंत्रण (System and Control) | १०० | | १०% | |
| | एकूण | ६०० | | १००% | |

## ब) सरासरी भरांकनानुसार ( Weighted Average) येणाऱ्या एकूण गुणांतून खालील बाबतीत गुण वजा करावेत:-

| Particulars | वजा करायचे गुण |
|---|---|
| संस्थेमध्ये लेखापरीक्षण कालावधीमध्ये अपहार/ गैरव्यवहार/ अफरातफर/ निधीचा दुर्बिनियोग आढळून आल्यास | 5 |
| नियम ३५ प्रमाणे बाहेरील कर्ज उभारणी मर्यादेचे उल्लंघन झालेले असल्यास व त्यास निबंधकांची मंजुरी घेतली नसल्यास | 2 |
| ५%चे वर थक बाकी असल्यास | 2 |
| बँक खात्याची वेळ पत्रके तयार केली असून सुद्धा त्यामध्ये ३ महिन्याच्या वरील नोंदणी प्रलंबित असल्यास | 1 |
| मुख्यालय व शाखांचे मेळ पत्रके तयार केली असून सुद्धा त्यामध्ये ३ महिन्याच्या वरील नोंदी प्रलंबित असल्यास | 1 |
| भाग भांडवल सर्व प्रकारची कर्ज ठेवी व्याज येणे देणे इतर येणे देणे व्याज तरतूद इत्यादी याद्या ताडेबंदाची जुळत नसल्यास | 2 |
| वैयक्तिक व समूह कमाल कर्ज मर्यादेचे ( Explore limit)उल्लंघन झाले नसल्यास | 2 |
| थकीत कर्ज वसुली वेडी समूह प्रचार परतफेड योजना राबविताना शासन निर्देशांचे लंगन झाले असल्यास | 1 |

**- सरासरी भरांकनानुसार ( Weighted Average) येणाऱ्या एकूण गुणांतून खालील बाबतीत गुण वजा करावेत:-**

| Particulars | वजा करायचे गुण |
|---|---|
| कलम ७०,१४४-९,अ,१४४-१०अ, उपविधी मधील तरतूद व नियमाक मंडळाकडील निर्देशांची उल्लंघन करून गुणवंतुकीत केल्यास तसेच अन्य पतसंस्थांकडून ठेवी स्वीकारल्यास | 2 |
| कलम १४४-७ अ नुसार संस्थेस आवश्यक नसेल अशा मालमत्तेची विल्हेवाट मुदतीत लावली नसल्यास | 1 |
| कलम ६५, नियम ४९ अ मधील तरतुदी व नियामक मंडळाकडील परिपत्रकीय सूचनानुसार उत्पादक व अनुत्पादक कर्ज गुंतवणूक इतर जिल्ह्यात इत्यादी बाबत आवश्यक त्या सर्व तरतुदी न करता निवड नफा / तोटा निश्चित केल्यास | 2 |
| संचालक मंडळ व संचालकांचे नातेवाईकांची कर्ज व इतर येणे रक्कमा कीत असल्यास व कायदेशीर कारवाई केली नसल्यास | 2 |
| कलम १४४-४ अ मध्ये नमूद व्यक्तिरिक्त इतर कामकाज व कलम १४४-६अ मध्ये नमूद व्यतिरिक्त व्यापार संस्था करीत असल्यास | 2 |

**टीप- अपहर रक्कम व्याजासह पूर्ण वसूल झाल्यास व अपहार करणाऱ्या व्यक्तींवर कायदेशीर कारवाई केली असल्यास वरील पाच गुण वजा करून नाहीत मात्र अंशत अपहर रक्कम बसून झाल्यास त्याचप्रमाणे गुण कमी करावेत**

## गुणांचा तपशील:-

| अ. क्रं | तपशिल | गुण |
|---|---|---|
| १ | सरासरी भरांकनानुसार ( Weighted Average) मिळालेले गुण | |
| २ | वरील प्रमाणे वजा (-)करावयाचे गुण | |
| ३ | संस्थेस प्रत्यक्ष प्राप्त गुण (१-२) | |

**वरील प्रमाणे सरासरी भरांकनानुसार ( Weighted Average) मिळालेले गुण व त्यातून वजा करावयाचे गुण वजा केल्यानंतर संस्थेस प्रत्यक्ष प्राप्त होणारे गुण विचारात घेऊन खालील प्रमाणे लेखापरीक्षण वर्ग प्रधान करण्यात यावा**

| अ.क्र. | लेखापरीक्षण वर्ग गुण तपशील | लेखापरीक्षण वर्ग | संस्थेत प्राप्त लेखापरीक्षण वर्ग |
|---|---|---|---|
| १ | ७५ व त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त झाले असल्यास | अ) | |
| २ | ६१ते ७४ पर्यंत गुण प्राप्त झाले असल्यास | ब) | |
| ३ | ५१ते ६० पर्यंत गुण प्राप्त झाले असल्यास | क) | |
| ४ | ५० पर्यंत गुण प्राप्त झाले असल्यास | ड) | |

**टीप :-**

1. विलीनीकरण करून घेतलेल्या संस्थेत विलीनीकरण नंतरच्या आर्थिक वर्षापासून पुढील सलग ५ वर्षासाठी लेखा परीक्षण वर्गवारीचे सरासरी भरांकन गुणांमध्ये खालील प्रमाणे प्रति वर्षात जादा गुण द्यावेत.

   प्रथम वर्ष- ५ गुण तृतीय वर्ष ४ गुण तृतीय वर्ष ३ चौथे वर्ष २ गुण पाचवे वर्ष १ गुण

   ( सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कडील परिपत्रक जाक्र पतसंस्था /५१०/२०१९ दिनांक नुसार ०८/०३/२०१९ नुसार)

2. एकूण मिळणाऱ्या गुणांची बेरीज अपूर्णांकात येत असल्यास ०.५० व त्यापेक्षा जास्त असेल तर पुढील पूर्वांक धरणीत यावा तसेच ०.५० पेक्षा कमी येत असेल तर पाठीमागील पूर्णांक धरणेत यावा

# महत्वाची व उपयुक्त लेखापरीक्षण परिपत्रके :

| Sr. No. | Particulars | Circular No And Date | Link | QR code |
|---|---|---|---|---|
| 1 | एनपीए सुधारीत निकष | जा. क्र. सआ -५/ पतसंस्था/नि. मं. सूचना/ एन.प. ए./ ४४४/ २०२४<br>५ फेब्रुवारी २०२४ | https://drive.google.com/file/d/1-9qaSDfuWt4h_kWrfHLsja3QlJTlFxGF/view?usp=drive_link | |
| 2 | CRAR Circular | जा. क्र. सआ -५/ पतसंस्था/नि. मं. सूचना/ एन.प. ए./ ४ १५/ २०२४<br>१ फेब्रुवारी २०२४ | https://drive.google.com/file/d/1BA3EGsNzluP5ySeH5m5VucePnHgZxDmD/view?usp=drive_link | |
| 3 | राज्यातील नागरी / ग्रामिण बिगर शेती सहकारी पतसंस्था व सेवक सहकारी पत संस्थांच्या वैधानिक लेखापरीक्षण वर्गवारीचे सुधारित निकष करणेबाबत.... | जा क्र.सआ – २०/ लेप-६/नापत व सेवक पतसंस्था/ ले. प. वर्गवारी निकष ६०७/२०२४<br>२७ मार्च २०२४ | https://drive.google.com/file/d/1lWhm9xoAKX42Dva7_0sQQxykZ0HUBh3R/view?usp=drive_link | |
| 4 | राज्यातील नागरी / ग्रामीण बिगर कृषी व पगारदार कर्मचारी सहकारी पतसंस्थांना माहिती व्यवस्थापन प्रणाली (MIS) लागू करणेबाबत.... | जा. क्र. पतसंस्था/ सआ -५/MIS प्रणाली/२०२२<br>२३ ऑगस्ट २०२२ | https://drive.google.com/file/d/1ts4iRT8QNBa_KdzxIUc_3ocs9VqM0nD7/view?usp=drive_link | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **5** | **राज्यातील ग्रामिण व नागरी सहकारी पतसंस्थांकरीता वैधानिक लेखापरीक्षण अहवालाचा आदर्श मसुदा** | **जा क्र.सआ / लेखापरीक्षण/ १९(१)/पतसंस्था/ ले.प. अहवाल मसुदा ४०७/२०२२<br>४ एप्रिल २०२२** | **https://drive.google.com/file/d/1zBbKydob_nplNYRvjmFOWXnIyC4g0BGE/view?usp=drive_link** | |
| 6 | सहकारी संस्थांचे वैधानिक लेखापरीक्षण अहवाल मराठी भाषेत सादर करणेबाबत... | जा क्र.सआ / लेखापरीक्षण/ लेखापरीक्षण अहवाल/ मराठी भाषा ५९६/२०२१<br>२५ मे २०२१ | https://drive.google.com/file/d/1sfx6pkavmxjCHw01e-feU1N8O18yi5QB/view?usp=drive_link | |
| 7 | Audit Manual | Outward No./ Min./Co-op., Mkt. & Tex./ VIP/ 1680/2018<br>27 November 2018 | https://drive.google.com/file/d/1RgzdxAfNKTT-g0lSxots-ERK9yCztRjI/view?usp=drive_link | |
| 8 | Audit - Point to be considered while doing Society Audit | | https://drive.google.com/file/d/1WX186qI9aYMRQXvUzozTbmE89wSmeIp7/view?usp=drive_link | |
| 9 | वित्तीय सहकारी संस्थांचे चाचणी लेखापरीक्षण शासकीय लेखापरीक्षकांकडून नियमितपणे कारणेबाबत....... | जा क्र.सआ / लेखापरीक्षण/ परिपत्रक/चाचणी लेखापरीक्षण/ २३४७/२०१७<br>२५ ऑक्टोबर २०१७ | https://drive.google.com/file/d/1xIXF8RAcOos_8atnvCQ-Hhxa_66IXvGb/view?usp=drive_link | |

| | | | |
|---|---|---|---|
| 10 | **महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतुदीनुसार सहकारी संस्थांचे चाचणी लेखापरीक्षण (Test audit) /फेरलेखापरीक्षण (Re-audit) प्रस्ताव सादर करणे व आदेश निर्गमीत करताना घ्यावयाच्या दक्षतांबाबत.** | **जा क्र.सआ -१९ लेप ३ /फेरलेप चा लेप सूचना /६२० /२०२३**<br>**१९ जून २०२३** | **https://drive.google.com/file/d/1vJXc71yXM0aAnhgDCxrKvr_dAyOAl2x4/view?usp=drive_link** |
| 11 | कलम ८२ अन्वये सहकारी संस्थांचे दोषदुरुस्ती अहवाल प्राप्त करुन घेणेबाबत..... | जा क्र.सआ -१९ लेप ३/दोषी दुरुस्तीअह/ कार्यवाही /६५९/२०२४<br>१२ एप्रिल २०२४ | https://drive.google.com/file/d/1Aj_YiIq-MMSgC3nJg097zPkGKi8-rf8x/view?usp=drive_link |
| 12 | Format of Audit Rectification Report - O Form | जा क्र.सआ/ लेखापरीक्षण/ दोषी दुरुस्तीअह/ २०८९/२०१७<br>१८ ऑक्टोबर २०१७ | https://drive.google.com/file/d/1wZPjD3HSzX9MMrH8qF1aIgeUSj34nznk/view?usp=drive_link |
| 13 | महाराष्ट्र राज्य बिगर कृषी सहकारी पतसंस्था नियामक मंडळ बैठक दिनांक २/५/२०१९ रोजीचे सभेतील ठरावाचे अंमलबजावणीबाबत... | जा. क्र. पतसंस्था/ सआ- ५/ नियामक मंडळ /प्रा११-१ अ/१९/१२१६<br>१० मे २०१९ | https://drive.google.com/file/d/15a-EberlgTvRz9uNqXw7bXsfpXxlr0u_/view?usp=drive_link |
| 14 | प्राथमिक कृषि पतपुरवठा सहकारी संस्थाचे वैधानिक लेखापरीक्षण अहवालाचा आदर्श मसुदा | जा क्र.सआ -१९ लेप ३/ प्रा कृ पत पु संस्था/ लेप अहं मसुदा/ ६३८ /२०२३<br>२१ जून २०२३ | https://drive.google.com/file/d/1Of_5FZEf8uGTe2l92PpVT3hMTbty1i8E/view?usp=drive_link |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 15 | **राज्यातील पतसंस्थांसाठी स्थिरीकरण व तरलता सहाय्य निधी योजना.** | | https://drive.google.com/file/d/1Wie7UdYDKy0CAM7Mb8tM4uSRd-2OTPbL/view?usp=drive_link | |
| 16 | कर्ज विषयक नियम (मसुदा परिपत्रक) | | https://drive.google.com/file/d/1gEVbjNr6tVQPHW0LAXE7DRaDok-ith84/view?usp=drive_link | |
| 17 | नागरी सहकारी पतसंस्थांना लागू करण्यात आलेल्या सुधारीत सामोपचार परतफेड योजनेस मुदतवाढ | | https://drive.google.com/file/d/1TijeNfLAvkdD-s5790-EN3m70OfOfbPS/view?usp=drive_link | |
| 18 | प्राथमिक कृषि पतपुरवठा सहकारी संस्थाचे वर्गवारीचे सुधारित निकष करणेबाबत.... | | | |

# महाराष्ट्र शासन

## सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

### सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग, नवीन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, पुणे - ४११००१

दूरध्वनी क्र. ०२०- [illegible]    मेल :- [illegible]mm..aud[illegible] @ [illegible]ail.com

जा.क्र.सआ.-२० /लेप.-६/नापत व सेवक पतसंस्था/ले.प.वर्गवारी निकष/ ६०७ /२०२४    दि.२५/०३/२०२४

राज्यातील नागरी / ग्रामिण बिगर शेती सहकारी पतसंस्था व सेवक सहकारी पत संस्थांच्या वैधानिक लेखापरीक्षण वर्गवारीचे सुधारित निकष लागू करणेबाबत...

# लेखापरिक्षण वर्गवारीच्या अनुषंगाने आर्थिक निकष व गुणोत्तरांचे महत्व (पगारदार पतसंस्थांसाठी )

- मा.सहकार आयुक्त जा.क्र. सआ-२०/लेप-६/नापत व सेवक पथसंस्था/ले. प. वर्गकारी निकष /६०७/२०२४, यांचे **दि.27/03/2024** च्या परिपत्रकानुसार पगारदार पतसंस्था करिता लेखापरीक्षण वर्गवारीचे निकष निश्चित करण्यात आलेले आहेत. पगारदार पतसंस्थांसाठी 200 गुणांचे वर्गवारी निकष निर्धारित करण्यात आलेले आहेत.
- सदरचे निकष 2024-25 या आर्थिक वर्षापासून लागू केलेले आहेत. नागरी सहकारी पतसंस्था करता लेखापरीक्षण वर्गवारीच्या निकषांमध्ये प्रामुख्याने आर्थिक निकष व गुणोत्तरांच्या आधारे गूणतालिका तयार करण्यात आलेली आहे. त्याबाबतचा संक्षिप्त तपशील खालिलप्रमाणे-

| अ.क्र. | लेखापरिक्षण वर्गवारीचे प्रमुख निकष | या निकषांमध्ये येत असलेले आर्थिक निकष व गुणोत्तरे | एकूण गूण |
|---|---|---|---|
| 1 | स्वनिधी | स्वनिधीचे प्रमाण, स्वनिधी वाढ क्षमता, वाढीचे प्रमाण | 45 |
| 2 | जिंदगीची गुणवत्ता | एनपीएचे प्रमाण | 55 |
| 3 | व्यवस्थापन | प्रशिक्षणाचे प्रमाण,थकबाकी वसुलिचे प्रमाण, ठेववाढिचे प्रमाण, | 38 |
| 4 | उत्पन्न व नफा | निव्वळ नफ्याचे खेळत्या भांडवलाशी, उत्पन्नाशी,गुंतवणुकीशी स्वनिधीशी प्रमाण, व्याज दुरावा, व्वस्थापन खर्चाचे प्रमाण. | 17 |
| 5 | लिक्विडिटी | सीडी रेशो, CRR व SLR, मुदत ठेवीचे एकूण ठेवींचे प्रमाण,अनुत्पादक गुंत्वणुकिचे प्रमाण | 15 |
| 6 | कार्यपद्धती व नियंत्रण | कार्यपद्धती व नियंत्रण | 30 |
| | | एकूण | 200 |

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग, नवीन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, पुणे - ४११००१

दूरध्वनी क्र. ०२०- २६१२२८४६ / ४७. ईमेल :- commaudit19@gmail.com

जा.क्र.सआ.-१९ /लेप.-३ /प्रा.कृ.प.पु.सह.संस्था /ले.प. वर्गवारी निकष /४८०/२०२४, दिनांक :- २९/०२/२०२४


राज्यातील प्राथमिक कृषि पतपुरवठा सहकारी संस्थांच्या वैधानिक लेखापरीक्षण वर्गवारीचे सुधारित निकष लागू करणेबाबत...


परिपत्रक

## मुद्दे निहाय एकूण गुण व लेखापरीक्षकाने दिलेल्या गुणांचा गोषवारा

| अ.क्र. | तपशील | एकूण गुण | लेखापरीक्षकाने दिलेले गुण |
|---|---|---|---|
| १ | भांडवल पर्याप्तता (CAPITAL ADEQUACY) | १५ | |
| २ | जिंदगीची गुणवत्ता व कर्जव्यवहार (ASSETS QUALITY) | ३५ | |
| ३ | निव्वळ नफा व लाभांश (EARNIGS) | १० | |
| ४ | व्यवस्थापन कार्यक्षमता (MANEGEMENT EFFICIENCY) | १५ | |
| ५ | हिशोबी कामकाज (ACCONTING & RECORD KEEPING) | १० | |
| ६ | संस्थेचे सर्वसाधारण कामकाज (SYSTEMS AND CONTROL) | १५ | |
| | एकूण गुण | १०० | |


# More Videos on YouTube for Banking /Co-operative/ RERA






**Maharashtra Co Operative Societies Audit FY 25-26**

View full playlist




**MH Co Op Socities - CAMELS Rating Guide**

View full playlist



**CA Parikshit Bhadade**

SUBSCRIBE




**www.caparikshitbhadade.in**

# Questions & Answers



Mobile No. :- **+ 9191055 69555**.
Email :- caparikshitbhadade@gmail.com



# Thank You